अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

सुधारित बांधकाम परवानगी

जावक क्रमांक / अ. न. प. / बांधकाम / नि. प्र. / ०६-०७/१७६ ११५८

अंबरनाथ नगरपरिषद कार्यालय, अंबरनाथ

दिनांक : ७/११/२००६

श्री / श्रीमती आरती केशव बनारे व इतर कुलमुखत्यार धारक श्री. विजय रामचंद्र कोहरी यांचे कुलमुखत्यार श्री. विजय रामचंद्र ओक, द्वारा श्री. पी. आर. आठल्ये, वास्तुशिल्पकार, अंबरनाथ

विषय स. नं. ३३ हि. नं. ७ पै. सि. स. नं. ८८७७ पै. प्लॉट नं. —

माजे किवली येथे बांधकाम करण्याच्या मंजूरी बाबत.

संदर्भ : आपला दि. ३/१०/२००६ चा

श्री पी. आर. आठल्ये

वास्तुशिल्पकार यांचे मार्फत सादर केलेले अर्ज.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये.

स. नं. ३३ हि. नं. ७ पै. सि. स. नं. ८८७७ पै. भूखंड क्रमांक —

माजे किवली मध्ये ६००.०० चौ. मी. भूखंडाच्या विकास करावयास महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि. ३/१०/२००६ च्या अर्जास अनुसरून पुढील शर्तीस अधीन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे तळघर / स्टील्ट, तळ मजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला रहाणेसाठी दुकाने / ऑफिस / दवाखाना, हॉस्पीटल / शाळेसाठी / गॅरेज वाडे भिंतीच्या इमारतीच्या बांधकामा बाबत, बांधकाम परवाना / प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

-: अटी :-

१ ही बांधकाम परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्ष पर्यंत वैध राहील नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नुतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशाप्रकारचे नुतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमाचा व नियोजित विकास आराखड्याच्या अनुषंगाने छाननी करण्यात येईल.

२ नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३ मा. जिल्हाधिकारी ठाणे, यांजकडून बांधकाम चालू करण्यापूर्वी अगोदर बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमच्यावर राहील व बिनशेतीच्या परवानगीची एक सत्य प्रत काम सुरु करावयाचे पंधरा (१५) दिवस अगोदर नगरपरिषदेकडे पाठविणे आवश्यक राहिल.

४ बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी नगरपरिषद कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

५ ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमिनी व्यतिरिक्त जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

६ बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटी प्रमाणे करता येईल. जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्या बाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे त्यानंतरच जोत्यावरील बांधकाम करावे.